September 17, 2026

To,
National Stock Exchange of India Limited
Exchange plaza,
Bandra-Kurla Complex,
Bandra (E), Mumbai – 400051.
SYMBOL: PRAMARA

Dear Sir / Ma'am,

Sub: Newspaper Publication - Notice of Postal Ballot

Please find enclosed herewith copies of the newspaper publications made in News Hub (English Newspaper) and Pratahkal (Marathi Newspaper) on September 17, 2026, intimating the dispatch of the Postal Ballot Notice to the Members of the Company and providing details relating to remote e-voting.

Kindly take the same on your record.

Thanking you,
Yours faithfully,

For Pramara Promotions Limited

ROHIT NANDKISHORE LAMBA
Digitally signed by ROHIT NANDKISHORE LAMBA
Date: 2026.09.17 14:50:25 +05'30'

Rohit Lamba
Managing Director
DIN: 01796007

'Russian Actress Ke ...
From 8 page..

BORN TO FIGHT FOR RIGHT

NEWS HUB

Circulation at : Mumbai, Navi Mumbai, Thane, Raigad, Palghar

▪ Vol. No.06 ▪ Issue No. 235 ▪ RNI No - MAHENG/2021/80003 ▪ EDITION - THANE ▪ THURSDAY, 17 SEPTEMBER 2026 ▪ EDITOR - MANISHA RAJENDRA SAINI ▪ PAGES 8 ▪ RS. 3 ▪

Black Badges, Mass Leave and Indefinite Strike: Court Employees Step Up Agitation Over Pay Scales

Secondary Court Employees Warn of Agitation; Demand 'Equal Pay for Equal Work'

Thane, Komal Shinde: The Maharashtra State Judicial Employees Federation (Group-C) has adopted an aggressive stance over its key demand for the implementation of higher pay scales for employees of subordinate courts across the state, on the lines of the High Court. Employees have expressed strong resentment as the state government has not yet taken a positive decision on the proposal submitted in January 2025 under the principle of 'equal pay for equal work.'

Against this backdrop, judicial employees of the Thane Civil Court and Sessions Court observed a protest on September 16 by wearing black ribbons while on duty, opposing the government's policy. The employees demanded that the government urgently take note of their demands.

A special general meeting of the Maharashtra State Judicial Employees Federation was held in Mumbai. Office-bearers of Group-C employees, stenographers, bailiffs and Class-IV employees' federations attended the meeting. It was decided that if the demands were not accepted, the agitation would be intensified in phases.

As per the planned course of action, judicial employees across the state wore black ribbons while working on September 16. Thereafter, they will again wear black ribbons for two days, on October 16 and 17, to register their protest. On November 5, employees from all cadres will participate in a mass leave agitation.

If the government still fails to take a positive decision on their demands, the federation has warned that employees of subordinate courts across the state will go on an indefinite strike from November 17.

A proposal has already been submitted to the government seeking higher pay scales for subordinate court employees on the lines of those applicable to High Court employees. Employee organisations claim that despite repeatedly submitting representations regarding the proposal, the government has not taken the expected decision.

Meanwhile, the federation claims that during the tenure of then Deputy Chief Minister Eknath Shinde, High Court employees were granted the benefit of higher pay scales with retrospective effect. However, according to the federation, more than 34,500 employees working in subordinate courts across the state are still deprived of this benefit.

The federation has urged the government to consider the demand of subordinate court employees sympathetically and positively and extend them the benefit of higher pay scales on the lines of High Court employees. The employees have resolved to intensify the agitation further if their demands are not addressed.

कच्च्या तेलाच्या दरवाढीने भारताची चिंता वाढली

मुंबई, दि. १६ (प्रतिनिधी) : मध्य पूर्वेतील तणाव आणि कच्च्या तेलाच्या पुरवठ्याबाबत वाढलेल्या चिंतेमुळे आंतरराष्ट्रीय बाजारात तेलाच्या किमती पुन्हा वाढल्या आहेत. बुधवारी, १६ सप्टेंबर रोजी ब्रेंट कच्च्या तेलाचा भाव प्रति बॅरल १०७ ते १०९ डॉलरच्या दरम्यान होता. अमेरिकेतील कच्च्या तेलाच्या साठ्यात वाढ झाल्याने दरात काहीशी नरमाई आली असली, तरी पुरवठ्यातील अडथळे कायम राहिल्यास कच्च्या तेलाचा भाव प्रति बॅरल १२० डॉलरपर्यंत जाण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर कच्चे तेल आयात करणाऱ्या भारतासाठी आयात खर्चासह देशांतर्गत महागाईवरही दबाव वाढण्याची शक्यता आहे.

कच्च्या तेलाच्या बाजारातील सध्याच्या घडामोडींमध्ये पुरवठ्याची चिंता प्रमुख ठरत आहे. सौदी अरेबियाच्या पूर्व-पश्चिम पाइपलाइनवरील हल्ल्यामुळे या मार्गावरील तेल वाहतूक विस्कळीत झाली आहे. तसेच यान्बू बंदरावरील तेल भरण्याचे कामही थांबवण्यात आले आहे. सौदी अरेबियातील तेल लाल समुद्रापर्यंत पोहोचविण्यासाठी ही पाइपलाइन महत्त्वाची मानली जाते. या मार्गामुळे सौदी तेलाची होर्मुझच्या सामुद्रधुनीमार्गे वाहतूक करण्याची गरज कमी होते. त्यामुळे या मार्गातील व्यत्यय दीर्घकाळ राहिल्यास जागतिक तेल पुरवठ्यावर परिणाम होण्याची बाजारात चिंता आहे.

भारताच्या दृष्टीने कच्च्या तेलाच्या दरवाढीचा थेट परिणाम तेल आयात खर्चावर होतो. देश आपल्या कच्च्या तेलाच्या गरजेचा मोठा भाग परदेशातून आयात करतो. त्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारातील दर वाढल्यास एका बॅरल तेलासाठी अधिक डॉलर खर्च करावे लागतात आणि देशाचे एकूण आयात बिल वाढते. भारतीय कच्च्या तेलाच्या टोपलीच्या किमतीतही अलीकडे मोठी वाढ झाली आहे. २ सप्टेंबर रोजी सुमारे ९९.३५ डॉलर असलेली किंमत १४ सप्टेंबर रोजी १२८.७ डॉलर प्रति बॅरलपर्यंत पोहोचली होती. दीर्घकाळ तेलाचे दर उच्च पातळीवर राहिल्यास सरकार तसेच तेल कंपन्यांवरही खर्चाचा दबाव वाढू शकतो.

मात्र, कच्च्या तेलाचा भाव १२० डॉलरवर पोहोचला म्हणून भारतात पेट्रोल आणि डिझेलच्या किमती दुसऱ्याच दिवशी त्याच प्रमाणात वाढतील, असे नाही. देशातील इंधन दर ठरविताना कच्च्या तेलाच्या किमतीबरोबरच डॉलरच्या तुलनेत रुपयाचा विनिमय दर, शुद्धीकरण खर्च, कर आणि तेल कंपन्यांचे मार्जिन यांसारख्या घटकांचाही विचार केला जातो. आंतरराष्ट्रीय बाजारातील दरातील दैनंदिन बदलही इंधनाच्या किरकोळ किमतीत लगेच प्रतिबिंबित होतातच असे नाही. मात्र, कच्च्या तेलाचे दर दीर्घकाळ उच्च पातळीवर राहिल्यास पेट्रोल आणि डिझेलच्या किमतींवर वाढता दबाव निर्माण होऊ शकतो.

कच्च्या तेलाच्या दरवाढीचा परिणाम इंधनापुरता मर्यादित राहत नाही. डिझेल महागल्यास ट्रक, बस आणि मालवाहू वाहनांच्या खर्चात वाढ होऊ शकते. परिणामी मालवाहतुकीचा खर्च वाढून त्याचा परिणाम विविध वस्तूंच्या किमतींवर होण्याची शक्यता असते. कंपन्यांकडून वाढलेल्या वाहतूक आणि उत्पादन खर्चाचा

विजय केडियांचा पाठिंबा असलेला रोबोकिड्सचा आयपीओ २१ सप्टेंबरला खुला

पुणे, दि. १६ (वार्ताहर) : तंत्रज्ञानावर आधारित शिक्षण आणि कौशल्य-विकास क्षेत्रातील 'रोबोकिड्स एडुवेंचर्स लि.' कंपनीचा आयपीओ (प्रारंभिक समभाग विक्री) २१ सप्टेंबर २०२६ रोजी सार्वजनिक गुंतवणुकीसाठी खुला होणार आहे. बीएसई एसएमई मंचावर नोंदणीसाठी आणण्यात येत असलेल्या या आयपीओची मुदत २३ सप्टेंबरपर्यंत राहणार आहे. कंपनीकडून या माध्यमातून ३१.०९ कोटी रुपये उभारण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

'रोबोकिड्स एडुवेंचर्स' ही के-१२ म्हणजे शालेय विद्यार्थ्यांसाठी तंत्रज्ञानाधारित शिक्षण आणि कौशल्य-विकास कार्यक्रम राबविणारी कंपनी आहे. रोबोटिक्स, कृत्रिम बुद्धिमत्ता, संगणक प्रोग्रामिंग, इलेक्ट्रॉनिक्स आणि एसटीईएम शिक्षणावर कंपनीचा मुख्य भर आहे. विद्यार्थ्यांमध्ये तंत्रज्ञानाशी संबंधित कौशल्ये विकसित करण्यासाठी कंपनीकडून विविध अभ्यासक्रम आणि उपक्रम राबविले जातात. आता भांडवली बाजारातून निधी उभारून कंपनीने विस्ताराच्या दिशेने पाऊल टाकले आहे.

कंपनीला प्रसिद्ध गुंतवणूकदार विजय केडिया यांचा पाठिंबा आहे. केडिया सिक्युरिटीज प्रा. लि.च्या माध्यमातून कंपनीच्या आयपीओपूर्वीच्या समभाग भांडवलात केडिया यांची ७.०२ टक्के भागीदारी आहे. त्यामुळे कंपनीच्या आयपीओकडे गुंतवणूकदारांचे लक्ष लागले आहे. कंपनीच्या वाढत्या तंत्रज्ञानाधारित शिक्षण क्षेत्रातील कामकाजाच्या पार्श्वभूमीवर हा आयपीओ बाजारात आणला जात आहे.

कंपनीकडून प्रत्येकी १० रुपये दर्शनी मूल्य असलेल्या २९,३२,८०० समभागांची शंभर टक्के नवीन समभाग विक्री केली जाणार आहे. यासाठी प्रति समभाग १०० ते १०६ रुपये अशी किंमत श्रेणी निश्चित करण्यात आली आहे.

या नवीन समभाग विक्रीतून

दोन दिवसांची घसरण थांबली; सेन्सेक्स ३३२ अंकांनी वधारला

मुंबई, दि. १६ (प्रतिनिधी) : सलग दोन दिवसांच्या घसरणीनंतर भारतीय शेअर बाजाराने बुधवारी, १६ सप्टेंबर रोजी पुन्हा उसळी घेतली. विविध क्षेत्रांतील समभागांत झालेली खरेदी आणि कच्च्या तेलाच्या दरातील काहीशी नरमाई यामुळे बाजाराला आधार मिळाला. अमेरिकेच्या फेडरल रिझर्व्हच्या पतधोरणाच्या निर्णयापूर्वी गुंतवणूकदार सावध राहिले असले, तरी प्रमुख निर्देशांकांनी सकारात्मक पातळीवर व्यवहाराची सांगता केली. मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स ३३२.६३ अंकांनी म्हणजेच ०.४५ टक्क्यांनी वाढून ७४,३३६.४५ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी ९९ अंकांनी म्हणजेच ०.४३ टक्क्यांनी वाढून २३,२१७.६० अंकांवर पोहोचला. निफ्टी बँक ४९७.७० अंकांनी वाढून ५६,२९२.४५ अंकांवर बंद झाला. बाजाराची सुरुवात सकारात्मक झाली असली, तरी सुरुवातीच्या व्यवहारात काहीशी दबावाची स्थिती होती. मात्र, त्यानंतर ग्राहकोपयोगी वस्तू, बांधकाम क्षेत्र, वित्तीय सेवा आणि बँकिंग क्षेत्रातील समभागांत खरेदी वाढल्याने निर्देशांकांनी तेजी कायम ठेवली. व्यापक बाजार मात्र प्रमुख निर्देशांकांच्या तुलनेत काहीसा मागे राहिला.

क्षेत्रीय निर्देशांकांमध्ये ग्राहकोपयोगी वस्तू क्षेत्र १.६३ टक्के आणि सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचा निर्देशांक १ टक्क्याहून अधिक वाढला. माहिती-तंत्रज्ञान क्षेत्राचा निर्देशांक १.५८ टक्क्यांनी घसरला, तर औषधनिर्मिती क्षेत्रातील दबाव राहिला. निफ्टीतील वाढीव समभागांमध्ये एसबीआय लाइफ इन्शुरन्स, एचडीएफसी लाइफ, आयटीसी, अ‍ॅक्सिस बँक आणि एसबीआय यांचा समावेश होता. एचडीएफसी लाइफचा समभाग २.७३ टक्क्यांनी वाढला.

motilal oswal Home Finance

मोतीलाल ओसवाल होम फायनान्स लिमिटेड
नोंदणीकृत कार्यालय: मोतीलाल ओसवाल टॉवर, रहिमतुल्ला सयानी रोड, परेल एसटी डेपोच्या समोर, प्रभादेवी, मुंबई - ४०००२५, सीएस: ८२९११८८९८९८ वेबसाईट: www.motilaloswalhf.com ,ईमेल: hfquery@motilaloswal.com

ताबा नोटीस (स्थावर मालमत्तेसाठी/मालमत्तांसाठी)

(सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ८ (१) अंतर्गत)

ज्याअर्थी, खालील स्वाक्षरीकर्ते हे मोतीलाल ओसवाल होम फायनान्स लिमिटेड (पूर्वी अस्पायर होम फायनान्स कॉर्पोरेशन लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) चे प्राधिकृत अधिकारी म्हणून, सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अ‍ॅसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट कायदा, २००२ (२००२ चा ५४) अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ३ सह वाचल्या जाणाऱ्या कलम १३ (१२) अंतर्गत प्राप्त अधिकारांचा वापर करून, खालील कर्जदारांना खाली नमूद केलेल्या तारखेला मागणी नोटीस जारी करून सदर नोटीस मिळाल्याच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत खाली नमूद केलेली रक्कम परतफेड करण्यास सांगण्यात आले होते.
खालील कर्जदारांनी सदर रकमेची परतफेड करण्यात कसूर केल्यामुळे, याद्वारे खालील कर्जदारांना आणि सर्वसामान्य जनतेला नोटीस देण्यात येते की, खालील स्वाक्षरीकर्त्यांनी सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ८ सह वाचल्या जाणाऱ्या सदर कायद्याच्या कलम १३ च्या उप-कलम (४) अंतर्गत प्राप्त अधिकारांचा वापर करून खाली वर्णन केलेल्या मालमत्तांचा ताबा खाली नमूद केलेल्या तारखेला घेतला आहे.

अ. क्र.	कर्ज करार क्र. / कर्जदार / सह-कर्जदार / जामीनदार यांचे नाव	मागणी नोटिशीची तारीख आणि थकीत रक्कम	ताबा घेतल्याची तारीख	स्थावर मालमत्तेचे वर्णन: मालमत्तेच्या पत्त्याचा समावेश असलेल्या मालमत्तेचा तो सर्व भाग आणि पार्सल
१	LXVIR00316-170045840 कर्जदार: घनश्याम लक्ष्मण पाटील / सह-कर्जदार: कार्तिकी घनश्याम पाटील	२०-०३-२०१८ रोजी रु. १०,१४,१२९/- साठी	११-सप्टेंबर-२०२६	फ्लॅट क्र. १०३, १ ला मजला, जय जीवदानी बिल्डिंग, ए विंग, गावठाण घर क्र. ३३१, ३३२, ३३३, ५४२ वर स्थित, गाव - आगाशी, विरार (पश्चिम) ४०००६०१, जि. ठाणे, महाराष्ट्र

विशेषतः कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेला याद्वारे सावध करण्यात येते की त्यांनी सदर मालमत्तेशी कोणताही व्यवहार करू नये आणि मालमत्तेशी केलेला कोणताही व्यवहार हा वर नमूद केलेल्या रकमेसाठी आणि त्यावरील व्याजासाठी मोतीलाल ओसवाल होम फायनान्स लिमिटेडच्या प्रभाराच्या (Charge) अधीन राहील. सुरक्षित मालमत्ता सोडवून घेण्यासाठी उपलब्ध वेळेच्या संदर्भात, कर्जदाराचे लक्ष या कायद्याच्या कलम १३ च्या उप-कलम (८) च्या तरतुदींकडे वेधण्यात येत आहे.

तारीख: १७.०९.२०२६ ठिकाण: महाराष्ट्र सही/-, प्राधिकृत अधिकारी
भाषांतरामध्ये त्रुटी आढळल्यास इंग्रजी मजकूर ग्राह्य धरण्यात येईल. (मोतीलाल ओसवाल होम फायनान्स लिमिटेड)